# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.11.2024** **वार – गुरुवार**

---

**लष्करी सराव**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यानच्या ऑस्ट्रहींद या तिसऱ्या संयुक्त लष्करी सरावाची सांगता आज पुण्यात झाली. यामध्ये दोन्ही देशांचे 255 जवान सहभागी झाले होते. यावेळी मेजर जनरल के टी जी कृष्णन म्हणाले की, दोन्ही देशातील संबंध संयुक्त लष्करी सरावामुळे अधिक दृढ झाले आहेत. सध्या जगातील परिस्थिती गुंतागुंतीची झाली आहे, तसंच सायबर हल्ल्यांचा फार मोठा धोका संभवतो. या परिस्थिती संयुक्त लष्करी सराव उपयुक्त ठरतो. ऑस्ट्रेलियाचे मेजर जनरल डेबिट थोमी म्हणाले की, दोन आठवड्याच्या या संयुक्त सरावात तंत्रज्ञानाची देवाणघेवाण, सामरिक कौशल्याचं आदानप्रदान, युद्ध कवायती, लष्करातील वैद्यकीय सुविधांची माहिती देण्यात आली. ऑस्ट्रहींद-4 पुढील वर्षी ऑस्ट्रेलियामध्ये होणार आहे.

**जागतिक युवा संमेलन**

लाईट हाऊस कम्युनिटीज फाउंडेशन आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं संयुक्तपणे नुकतंच पाचवं जागतिक युवा संमेलन आयोजित केलं होतं. तरुणांच्या आर्थिक, सामाजिक विकासाला चालना देणं आणि त्यांच्या करिअरसाठी आवश्यक संधी आणि कौशल्य विकासाचे नवनवीन मार्ग तयार करण्याच्या उद्देशानं या संमेलनाचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये फाउंडेशनचे 3 हजारपेक्षा अधिक माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. त्याचबरोबर 12 देशातील 15 पेक्षा जास्त कम्युनिटीज मधील तरुणाई या समारंभात सहभागी झाली होती. या संमेलनात विविध प्रकारची चर्चासत्र आयोजित करण्यात आली होती, अशी माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

**शिष्यवृत्ती सप्ताह**

2024-25 या शैक्षणिक वर्षामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या 14 शिष्यवृत्ती योजनांसाठी आता ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत. शिष्यवृत्तीसाठी ऑनलाइन अर्ज करण्यासाठी आता 25 ते 30 नोव्हेंबर या कालावधीत विशेष सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. या सप्ताहात विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलद्वारे शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची संधी मिळणार आहे. या सप्ताहात शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणं, शिष्यवृत्ती अर्ज भरताना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी पुढाकार घेणं, आणि अर्ज भरण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना पुण्याच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. अशोक उबाळे यांनी दिल्या आहेत.

**<u>वेळापत्रक</u>**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुढच्या वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेचं वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आलं आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा 11 फेब्रुवारी ते 18 मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा 21 फेब्रुवारी ते 17 मार्च या कालावधीत होणार आहे. राज्य शिक्षण मंडळाचे सचिव देविदास कुल्हाळ यांनी प्रसिद्धि पत्रकाद्वारे याबाबतची माहिती दिली आहे. परीक्षेचं विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक राज्य मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलं जाणार आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकाची सुविधा ही केवळ माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांकडे छापील स्वरुपात देण्यात येणारं वेळापत्रकच अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या तारखांची खात्री करून परीक्षा द्यावी. अन्य संकेतस्थळांवरील किंवा यंत्रणेने छपाई केलेलं, किंवा अन्य माध्यमातून प्रसिद्ध झालेलं वेळापत्रक ग्राह्य धरू नये, असं या निवेदनात स्पष्ट करण्यात आलं आहे.

**<u>समाधी सोहळा</u>**

संत ज्ञानेश्वर माउली संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आळंदीमध्ये येत्या 23 ते 30 नोव्हेंबर या कालावधीत कार्तिक वारी होणार आहे. 26 तारखेला कार्तिक एकादशी तर गुरुवारी 28 तारखेला माउलींचा संजीवन समाधी सोहळा आहे. यानिमित्त आळंदीमध्ये राज्याच्या तसंच देशाच्या कानाकोपऱ्यातून सुमारे सहा ते सात लाख भाविक दर्शनासाठी येतील असा अंदाज आहे. या काळात गर्दीचं नियोजन करण्यासाठी येत्या शनिवारपासून पुढचे आठ दिवस आळंदीत प्रवेश करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी करण्यात आली आहे. वारकऱ्यांच्या दिंडीची वाहनं आणि अत्यावश्यक सेवा देणाऱ्या वाहनांना मात्र यातून वगळण्यात आलं आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त बापू बांगर यांनी दिली.

**<u>पुरस्कार</u>**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कोथरूड शाखेतर्फे देण्यात येणारा यशवंत-वेणू पुरस्कार, प्रसिद्ध अभिनेते संजय मोने आणि प्रसिद्ध अभिनेत्री सुकन्या कुलकर्णी-मोने यांना जाहीर झाला आहे. माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनी आणि यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या 24व्या वर्धापन दिनानिमित्त येत्या सोमवारी आयोजित सोहळ्यात त्यांना सन्मानित केलं जाणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात किमान तापमानात घट होत असून सकाळच्या वेळी चांगलीच थंडी जाणवत आहे. उद्या आकाश निरभ्र राहील. कमाल 30 अंश तर किमान 13 अंश सेल्सियस तापमानाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**